MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३९१५/८८० दि.१३ एप्रिल,२०१७

## शु ध्दी प त्र क

**विषयः- नवीन विना अनुदान तत्वावरील कृषि व संलग्न महाविद्यालयांना परवानगी देणे तसेच नवीन तुकडीवाढ प्रकरणी जमा केलेल्या शुल्काच्या परताव्याबाबत.**

संदर्भः- कृषी परिषदेचे परिपत्रक क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि.११/२/२०१६

नवीन विना अनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसंबंधी करावयाच्या कार्यवाहीसाठी सुधारीत शुल्क लागू करण्याबाबत संदर्भीय परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ वगळता सर्व रकमा ना परतावा आहेत. तथापि, काही कारणास्तव संस्थांकडून नवीन महाविद्यालये आणि तुकडीवाढीसाठी प्रस्तावासोबत कृषि परिषदेकडे जमा केलेले प्रक्रिया शुल्क परत मिळण्याची मागणी करतात. सदर बाब विचारात घेवून उक्त परिपत्रकान्वये लागू करण्यात आलेल्या शुल्काच्या परताव्यासंबंधी खालीलप्रमाणे बाबी निश्चित करण्यात येत आहेत.

१. नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी छाननी व पडताळणी झाल्यानंतर संस्था अपात्र ठरत असेल किंवा संस्थेने महाविद्यालय सुरु करण्यास असमर्थता दर्शविली असेल, अशा प्रकरणी संस्थेने कृषि परिषदेकडे जमा केलेले रु. ५.०० लाख प्रक्रिया शुल्क संस्थेस परत करण्यात येईल.
२. संस्था महाविद्यालय सुरु करण्यास इच्छुक नसेल आणि विद्यापीठाकडून प्रस्तावाबाबत कोणतीही प्रक्रिया झालेली नसेल, अशा प्रकरणी संस्थेने जमा केलेले रु.८.०० लाख प्रक्रिया शुल्काची संपूर्ण रक्कम संस्थेस परत करण्यात येईल.
३. संबंधित कृषी विद्यापीठाने प्रस्तावित महाविद्यालयास भेट देवून नवीन महाविद्यालयाचा प्रस्ताव नाकारला किंवा कृषी विद्यापीठाच्या तपासणीनंतर संस्थेने महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केल्यास, विद्यापीठाकडे वर्ग केलेले रु.३.०० लाख वगळता कृषी परिषदेकडे जमा असलेली उर्वरीत प्रक्रिया शुल्क रु.५.०० लाख संबंधित संस्थेस परत करण्यात येईल.
४. तुकडीवाढीच्या प्रस्तावासंदर्भात कृषी विद्यापीठाच्या तपासणीनुसार संबंधित महाविद्यालय तुकडीवाढीसाठीचे निकष पूर्ण करीत नसल्याने महाविद्यालयास तुकडीवाढ नाकारल्यास संस्थेने कृषि परिषदेकडे जमा केलेले प्रक्रिया शुल्क संस्थेस परत करण्यात येणार नाही. तथापि, कृषी विद्यापीठाने तपासणी करण्याआधीच संस्थेने तुकडीवाढीचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केल्यास प्रक्रिया शुल्काची संपूर्ण रक्कम संस्थेस परत करण्यात येईल.

(सही) १३/४/१७

संचालक (शिक्षण)

प्रतः-

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली
२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध करून देण्यात यावे.